# वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी

## विद्यापीठाने निर्मिती केलेले सुधारीत व संकरीत वाणाबद्दल सर्व समावेशक व सविस्तर माहिती

| अ.क्र. | तपशील | सविस्तर माहिती |
|---|---|---|
| १ | **पीक/वाणाचे नाव** | **कापूस : पीएचए ४६** |
| २ | **प्रसारीत केल्याचे वर्ष** | १९९४ |
| ३ | **प्रसारीत करणारी संस्था/विद्यापीठ** | वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी |
| ४ | **जमीन** | मध्यम ते भारी |
| ५ | **हवामान** | कोरडवाहू<br>(६० ते ७५ सेंमी पाऊस,दिवसा उष्ण व रात्री थंड हवामान) |
| ६ | **पेरणी/लागवडीचा कालावधी** | खरीप (जून-जुलै) मॉन्सूनचा ७० ते ८० मिमी पाऊस पडताच पेरणी करावी. १५ जुलैनंतर पेरणी करु नये. |
| ७ | **प्रती एकर बियाणे** | ४ ते ५ किलो |
| ८ | **पीक व्यवस्थापन** | |
| | **१ लागवडीचे/पेरणीचे व्यवस्थापन** | **जमिनीची निवड :-** कपाशीच्या लागवडीसाठी मध्यम ते भारी, कसदार व पाण्याचा योग्य निचरा होणारी जमीन आवश्यक आहे.<br>**पूर्व मशागत :-** शेतातील मागील वर्षाचे पीक निघाल्याबरोबर खोल नांगरणी करुन मोगडणी करावी. तीन ते चार वखराच्या पाळया घ्याव्या. शेवटची वखरपाळी पूर्वी ५ टन (१०-१२ गाडया) शेणखत पसरुन टाकावे.<br>**पिकांची फेरपालट :-** कपाशीवर कपाशीचे पीक घेऊ नये. कोरडवाहू लागवडीमध्ये हरभरा व ज्वारी या पिकानंतर कापूस पीक घ्यावे.<br>**पेरणीची वेळ :-** कापसाची लागवड मान्सूनच्या ७० ते ८० मि.मी. पाऊस पडताच करावी. १५ जुलैनंतर कपाशीची पेरणी करु नये.<br>**पेरणीची पध्दत :-** पेरणी टोकण पध्दतीने करावी. ओळीतील अंतर ६० से.मी. व रोपांतील अतर ३० से.मी ठेवावे. सर्वसाधारणपणे एका फुलीवर दोन बिया टाकाव्यात.<br>**बियाण्याचे प्रमाण :-** प्रती हेक्टरी १० ते १२ किलो बियाणे लागते.<br>**बीज प्रक्रिया :-** नत्र स्थिरीकरणासाठी ॲझोटोबॅक्टर व स्फुरद विद्राव्य करणा-या जीवाणुंची बीज प्रक्रिया २५ ग्रॅम प्रती कि.ग्रॅ. बियाणे या प्रमाणात पेरणीपूर्वी करावी. |
| | **२ खत व्यवस्थापन** | मराठवाडयात कोरडवाहू लागवडीमध्ये देशी कापूस पिकास ६०:३०:३०, कि.ग्रॅम / हेक्टर नत्र, स्फुरद व पालाश या प्रमाणात खताची मात्रा द्यावी. यापैकी ५० टक्के नत्र, संपूर्ण स्फुरद व पालाश पेरणीच्या वेळीच अथवा पेरणीपूर्वी द्यावे. उर्वरित ५० टक्के नत्र ४५ दिवसांनी द्यावे. |
| | **३ पाणी व्यवस्थापन** | शेवटच्या आंतरमशागतीपूर्वी कोळप्याच्या जानोळयास दारी अथवा पोते बांधून उतारास आडव्या स-या पाडाव्यात. त्यामूळे शेवटच्या पावसाचे पाणी जमिनीत जास्त मुरेल व त्याचा फायदा बोंडे पक्व होण्यासाठी होईल. पावसाचा दीर्घ खंड पडल्यास पाण्याच्या एक ते दोन पाळया द्याव्यात. |

| | | |
|---|---|---|
| ४ | **कीड व्यवस्थापन** | |

| कीड | कीटकनाशक | प्रमाण / प्रती १० लीटर पाणी |
|---|---|---|
| मावा, तुडतुडे व फुलकिडे | डायमेथोएट ३० ईसी<br>मिथील डिमेटॉन २५ ईसी<br>ॲसिटामीप्रीड २० एसपी<br>इमिडाक्लोप्रीड १७.८ एसएल<br>थायोमिथाक्झाम २५ डब्ल्युजी<br>फिप्रोनील ५ एससी | १० मिली<br>८ मिली<br>२ ग्रॅम<br>४ मिली<br>३ ग्रॅम<br>२० मिली |
| पांढरी माशी | ट्रायझोफॉस ४० ईसी<br>ड्रायफेन्थुरॉन ५० डब्ल्यु पी | २० मिली<br>८ ग्रॅम |
| पिठया ढेकूण | क्लोरोपायरीफॉस २० ईसी<br>ॲसिफेट ७५ एसपी<br>(कीटकनाशकात २० ग्रॅम धुण्याची पावडर मिसळावी | ३० मिली<br>२० मिली |
| बोंड अळी | क्विनॉलफॉस २५ ईसी<br>थायोडीकार्ब ७५ डब्ल्यू पी<br>स्पिनोसॅड ४५एससी | २० मिली<br>२० ग्रॅम<br>४ मिली |

| | | |
|---|---|---|
| ५ | **रोग व्यवस्थापन** | दहिया हा रोग कपाशीवर येतो. ऑगस्ट महिन्यात सुरुवातीपासून हा रोग आढळतो. या रोगाचे लक्षण म्हणजे प्रथम झाडाच्या जुन्या पानावर खालच्या बाजूस पांढ-या रंगाचे पट्टे दिसून येतात. |

| रोग | व्यवस्थापन उपाय |
|---|---|
| करपा (पानावरील ठिपके ) | .सिडोमोनास फ्लुरोसन्सची बीजप्रक्रिया १० ग्रॅम /कि.ग्रॅ. या प्रमाणात करावी.<br>पी.एफ.-१ द्रावणाची ०.२ टक्के तीव्रतेची किंवा कॉपर ऑक्सी क्लोराई २५ ग्रॅम / १० लीटर पाणी या प्रमाणात ३०, ६० व ९० दिवसांनी फवारणी करावी. |
| दहिया | बावीस्टीन १० ग्रॅम किंवा ८० टक्के गंधक २५ ग्रॅम / १० लीटर पाणी या प्रमाणात ३०,६० व ९० दिवसांनी फवावरणी करावी. |

| | | |
|---|---|---|
| ९ | **पिकाचा कालावधी** | १८० ते १९० दिवस |
| १० | **उत्पादकता** | १६ ते १७ क्विं. प्रती हेक्टर |
| ११ | **वाणाची वैशिष्ट्ये/विशेष गुणधर्म** | १. अर्बोरियम व हर्बोशियम देशी कापसाच्या आंतरजातीय संकरातून निर्मित संकरीत वाण<br>२. अधिक उत्पादकता |
| १२ | **वाणासंबंधीचे छायाचित्रे** |  |